पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 09/11/2019 (शनिवार)
(दुपार)

---

## विनयभंग

पो.स्टे. कळमेश्वर :– दि. 08/11/2019 चे 15:00 वा. ते 16:00 वा. चे सुमारास फिर्यादींची 5 वर्षीय पीडित हिला 13 वर्षीय विधी संघर्षग्रस्त बालक याने तिला केटीएम कंपनीच्या पाठीमागे मोकळया जागेत घेवून गेला तसेच विधी संघर्षग्रस्त बालकाने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354(ब) भादंवि. सहकलम 8, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा सहकलम 3(1)(डब्लु),(i)(ii)3(2)(व्हीए) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. 1989. कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय विभागीय पोलिस अधिकारी श्री. सरंभरकर 9920211266 हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 03 कि.मी अंतरावर जुनीवस्ती चौक बुटीबोरी येथे दिनांक 07/11/2019 चे 20.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अमित अरूनराव भोयर, वय 20 वर्ष, रा. वार्ड क्र. 8 जुनीवस्ती बुटीबोरी हा जुनीवस्ती चौकात हजर असतांना आरोपी क्र. 1) सरोज नेवारे याने फोन करून विचारले की ''तु कुठे आहे.'' यानंतर आरोपी क्र. 1) सरोज नेवारे, 2) मोनु लांबा, 3) तौषीक उर्फ गोलु, 4) राजा पठाण सर्व रा. बुटीबोरी व 5) पवन रा. घोटी यांनी गैरकायदयाची मंडळी गोळा करून फिर्यादीस हातबुक्याने मारहाण करून शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम 143,147,149,323,504,506 भादंवी, सह कलम 135 मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. थोरात हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 08 कि. मी. अंतरावर मौजा रोहणा येथे दिनांक 29/10/2019 चे 17.00 वा. दरम्यान कु. चेतना उकंडराव खंडाते(मृतक), वय 18 वर्ष, रा. रोहणा, ता. नरखेड हिने राहत्या घरी कोणीही हजर नसतांना अज्ञात कारणातुन विषारी औषध प्राशन केले. दरम्यान तिची प्रकृती खराब झाल्याने तिला उपचाराकामी प्रथम शासकीय रूग्णालय काटोल व नंतर मयो हॉस्पीटल, नागपूर येथे भरती केले असता दि. 30/10/19 चे 00:15 वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार राजेन्द्र मेश्राम, मेयो पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास तपास सुरू आहे.

2) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर वार्ड क्र. 17 मोवाड येथे दिनांक 14/10/2019 चे 07.00 वा. ते 12:00 वा. दरम्यान सौ. पदमा प्रशांत गजभीये(मृतक), वय 50 वर्ष, रा. मोवाड यांनी रागाचे भरात राहत्या घरी ठेवलेले पेट्रोल अंगावर ओतुन स्वतः पेटवुन घेतले. पदमा गजभीये या जळाल्याने त्यांना उपचाराकरीता प्रथम ग्रामीण रूग्णालय नरखेड व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता दिनांक 24/10/2019 रोजी त्यांचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्र मेडीकल पोलीस बुथ नागपुर येथुन प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार प्रमोद वाळके, मेडीकल पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा शैलेश डोंगरदिवे हे करीत आहे.

3) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 4 कि. मी अंतरावर मौजा नंदापुर शिवार कन्हान नदिच्या पात्रात येथे दिनांक 07/11/2019 चे 19.00 वा. दरम्यान अंदाजे 40 ते 45 वयोगटातील अनोळखी पुरूष हा मृत अवस्थेत मिळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कमलाकर हिराजी चौधरी, वय 35 वर्ष, रा. नंदापुर यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. खापा येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस नाईक वानखेडे हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर